# पंजाबमधील सतलज नदीत स्नान करण्यावर बंदी

■ अमृतसर



**शहीद** भगतसिंग नगरचे जिल्हाधिकारी गुलप्रीत सिंग औलख यांनी जिल्ह्याच्या हद्दीत येणाऱ्या सतलज नदी आणि बिस्त दोआब कालव्यात स्नान करण्यावर बंदी घालण्याचे आदेश जारी केले आहेत. या दोन ठिकाणी स्नान करणाऱ्या व्यक्ती खोल पाण्यात उतरून बुडण्याच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकाऱ्यांनी भारतीय राष्ट्रीय सुरक्षा संहिता, २०२३ च्या कलम १६३ अंतर्गत आपल्या अधिकारांचा वापर करून ही बंदी लागू केली आहे.

जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले की, अशा दुर्दैवी घटनांमुळे कुटुंबे तसेच जिल्हा प्रशासन व्यथित झाले आहे, ज्यामुळे ही बंदी घालणे आवश्यक झाले आहे. कोणी घटनास्थळी आंघोळ करताना आढळले, तर पोलीस विभाग नियमांनुसार त्यांच्यावर गुन्हा दाखल करू शकतो. हा आदेश ४ जुलै २०२६ पर्यंत अंमलात राहील.

# हिमाचलमध्ये तलावात बुडून २ भावांचा मृत्यू

■ शिमला

**हिमाचल** प्रदेशच्या सिरमौर जिल्ह्यातील देवमनल येथे तलावात बुडून दोन भावांचा मृत्यू झाला. या घटनेमुळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. तहसीलदार नौहराधर विनोद कुमार यांनी सांगितले की, कुटुंबियांना प्रत्येकी २५,००० रुपयांची तात्काळ मदत देण्यात आली.

८ वर्षांचा अयान आणि ९ वर्षांचा अभिनव त्यांचे वडील प्रवीण यांच्यासोबत तलावाच्या काठावर गेले होते. त्यांचे वडील कामात व्यस्त असताना अरुंद वाटेवर अयानचा पाय घसरला आणि तो तलावात पडला. त्याला वाचवण्याच्या प्रयत्नात त्याचा मोठा भाऊ अभिनव देखील तलावात पडला. दोघांनी एकमेकांना वाचवण्यासाठी बराच वेळ धडपड केली, पण ते अयशस्वी ठरले आणि पाण्यात बुडून त्यांचा मृत्यू झाला. वडिलांना या घटनेबद्दल उशिरा समजले. वडील घटनास्थळी पोहोचेपर्यंत दोघांचे मृतदेह पाण्यात तरंगत होते. वडिलांनी तात्काळ १०८ रुग्णवाहिकेला फोन करून दोघांनाही तलावातून बाहेर काढले आणि नौहराधर रुग्णालयात नेले. जिथे डॉक्टरांनी दोघांनाही मृत घोषित केले.

देश विदेश

# दक्षिण कोरियात रोबोट भिक्षू धर्म व कृत्रिम बुद्धिमत्तेचा संगम

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

■ सेऊल



**दक्षिण** कोरियात बुद्ध जयंतीच्या पूर्वसंध्येला एक अनोखा प्रयोग पाहायला मिळाला. सेओल येथील प्रसिद्ध जोगे मंदिरात देशातील पहिल्या मानवाकृती रोबोट भिक्षूचे अधिकृत पदार्पण झाले. या रोबोट भिक्षूचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे .

राखाडी आणि तपकिरी रंगाचे पारंपरिक वस्त्र परिधान केलेल्या या रोबोटने बौद्ध धार्मिक समारंभात सहभाग घेतला. गॅबी असे नाव असलेला हा रोबोट सुमारे १३० सेंटिमीटर उंच असून तो मानवासारखी हालचाल करून प्रतिसाद देऊ शकतो.बुद्ध जयंतीपूर्वी जोगे मंदिरात पारंपरिक दीक्षा समारंभ आयोजित करण्यात आला होता. या समारंभात गॅबीने भिक्षू आणि भिक्षुणींसोबत सहभाग घेतला. सामान्यतः हा विधी मानवांसाठी असतो. मात्र यावेळी रोबोटलाही प्रतीकात्मक दीक्षा देण्यात आली. त्याच्या गळ्यात १०८ मण्यांची जपमाळ घालण्यात आली, जी बौद्ध धर्मात पवित्र मानली जाते. समारंभादरम्यान गॅबीने हात जोडून वरिष्ठ भिक्षूंना वंदन केले आणि विचारलेल्या प्रश्नांना उत्तरेही दिली.

# पंजाब प्रांतमध्ये खासगी शाळेचे छत कोसळून ४ मुलांचा मृत्यू

■ लाहोर

**पंजाब** प्रांतच्या डेरा गाझी खान परिसरात असलेल्या एका खाजगी शाळेचे छत कोसळल्यामुळे ४ मुलांचा मृत्यू झाला आणि २० जण जखमी झाले. सर्व जखमींना जवळच्या रुग्णालयात नेण्यात आले आहे. पंजाबच्या मुख्यमंत्री मरियम नवाज यांनीही या घटनेची दखल घेतली असून संबंधित अधिकाऱ्यांकडून अहवाल मागवला. जिल्हा प्रशासनाच्या तपासात उघड झाले की, ज्यावेळी शाळेतील एका वर्गाचे छत कोसळले, तेव्हा शाळेच्या इमारतीच्या विस्ताराचे बांधकाम सुरू होते. खोलीच्या छतावर वाळू आणि विटा ठेवल्यामुळे छतावर अतिरिक्त भार पडला होता. त्यामुळेच शाळेचे छत कोसळल्याचा अंदाज लावला जात आहे. दुपारी १२ वाजता या घटनेची माहिती मिळताच बचावपथक आणि रुग्णवाहिका घटनास्थळी दाखल झाल्या. बचावपथक आणि जिल्हा अधिकाऱ्यांनी स्थानिक रहिवाशांच्या मदतीने ढिगाऱ्याखालून विद्यार्थी आणि शिक्षकांना बाहेर काढले.

# अमेरिका पाकिस्तानमधील वाणिज्य दूतावास बंद करणार

■ वॉशिंग्टन

**अमेरिकेने** पाकिस्तानातील पेशावर येथील आपला वाणिज्य दूतावास टप्प्याटप्प्याने बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. अमेरिकेचा परराष्ट्र विभाग यांच्या माहितीनुसार, हा निर्णय मुख्यतः अमेरिकन राजनैतिक अधिकाऱ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने घेण्यात आला आहे.

हा बदल तत्काळ न करता नियोजनबद्ध पद्धतीने अमलात आणला जाणार असून, त्यासाठी प्रशासकीय प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. पेशावर येथील दूतावासाचे कामकाज कायमस्वरूपी बंद करण्यात येणार आहे. आतापर्यंत खैबर पख्तूनख्वा प्रांताशी संबंधित राजनैतिक व्यवहार या दूतावासामार्फत हाताळले जात होते. आता या सर्व जबाबदाऱ्या इस्लामाबाद येथील अमेरिकेच्या मुख्य दूतावासाकडे वर्ग केल्या जाणार आहेत. अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, हा निर्णय घेताना राजनयिक कर्मचाऱ्यांची सुरक्षा आणि उपलब्ध स्रोतांचा कार्यक्षम वापर या दोन्ही बाबींचा विचार करण्यात आला आहे.

# समाजवादी पक्षाच्या सचिवांसह ३० पदाधिकारी सुहेलदेव पक्षात

■ लखनौ

उत्तर प्रदेश विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सुहेलदेव भारतीय समाज पक्षाने (एसबीएसपी) आपली संघटनात्मक विस्तार मोहीम तीव्र केली. समाजवादी पक्ष आणि विणकर कामगार विकास समितीशी संबंधित ३० पदाधिकारी एसबीएसपीमध्ये सामील झाले. पक्षाचे राष्ट्रीय मुख्य प्रवक्ते अरुण राजभर यांनी सांगितले की, या सर्व नेत्यांची नोंदणी करण्यात आली असून पक्षाची सदस्यसंख्या वाढत आहे.

पक्षात सामील झालेल्यांमध्ये समाजवादी पक्षाचे राष्ट्रीय सचिव जावेद आलम हे प्रमुख होते. तसेच विणकर कामगार विकास समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष शहाबुद्दीन अन्सारी, राष्ट्रीय उपाध्यक्ष डॉ. मोहम्मद नाझीम अन्सारी, युवा विंगचे राष्ट्रीय उपाध्यक्ष ताजुद्दीन अन्सारी, दिल्ली प्रदेशाध्यक्ष खालिद सैफी, राष्ट्रीय सचिव अयुब अन्सारी, प्रदेश प्रभारी कारी लैक अन्सारी, युवा विंगचे जिल्हाध्यक्ष मुफ्ती अय्यम अन्सारी, मोहम्मद अयुब अन्सारी, जिल्हाध्यक्ष मोहम्मद अयुब अन्सारी आदी उपस्थित होते. या कार्यक्रमात समाजवादी पक्षावर निशाणा साधत अरुण राजभर यांनी समाजवादीचे अध्यक्ष अखिलेश यादव यांच्यावर जोरदार हल्ला चढवला. ते म्हणाले की, समाजवादी पक्षाची 'पीडीए' ही घोषणा राजकीय गरजेनुसार बदलत असते. 'पीडीए' म्हणजे 'पार्टी ऑफ डिंपल अँड अखिलेश' आहे.

# राज्यात ६० वाहतूक उद्याने उभारणार परिवहन मंत्री सरनाईकांची माहिती

■ मुंबई

**राज्यभरात** ६० वाहतूक उद्याने उभारण्याचा प्रस्ताव परिवहन विभागाने तयार केला असून, प्रत्येक उद्यानासाठी १ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

मंत्री सरनाईक म्हणाले की, प्रत्येक जिल्ह्यात किमान एक वाहतूक उद्यान उभारले जाणार आहे. या उपक्रमातून बालकांना प्रत्यक्ष अनुभवाच्या माध्यमातून वाहतूक नियमांचे शिक्षण दिले जाणार आहे. या गार्डनमध्ये लहान आकाराचे रस्ते, झेब्रा क्रॉसिंग, वाहतूक सिग्नल, दिशादर्शक फलक तसेच छोट्या वाहनांच्या प्रतिकृती उभारण्यात येणार आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष सरावातून वाहतुकीचे नियम समजावून सांगितले जाणार आहेत. भविष्यात जबाबदार वाहनचालक घडवण्यासाठी हा उपक्रम उपयुक्त ठरणार आहे. विशेष म्हणजे, या उद्यानांमध्ये पर्यावरणपूरक उपक्रमांनाही प्राधान्य दिले जाणार आहे. देशभरातील दुर्मीळ वृक्षांच्या जातींची लागवड करून त्यांचे पर्यावरणीय महत्त्वही नागरिकांना समजावले जाणार आहे.

# सात वर्षानंतर विरारमधील नारिंगी पूल वाहतुकीला खुला

■ विरार

**विरार** शहरातील वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणारा नारिंगी पूल शुक्रवारपासून खुला झाला. मागील ७ वर्षापासून या पूलाचे काम रखडले होते.

विरारमधील नारिंगी येथे रेल्वे फाटक आहे. तेथे मोठी वाहतूक कोंडी व्हायची. यासाठी ७ वर्षांपूर्वी नारिंगी रेल्वे उड्डाणपूलाचे काम हाती घेण्यात आले होते. जवळपास ७०० मीटर लांब असलेल्या या पूलासाठी ४० कोटी रुपयांचा खर्च आला. मागील अनेक वर्षापासून विविध कारणांमुळे पूलाचे काम रखडले होते. अखेर आज पालकमंत्री गणेश नाईक आणि वसई-विरार महापालिकेचे महापौर अजीव पाटील यांच्या हस्ते या पूलाचे उद्घाटन करण्यात आले. या पूलामुळे विरार पूर्व आणि पश्चिम थेट जोडले जाणार असून प्रवासाचा किमान अर्ध्या तासाचा वेळ वाचणार आहे.

# मालमत्ता करात २० टक्के करवाढ भाजपाचा आंदोलनाचा इशारा

■ विरार

**वसई-विरार** महापालिकेने चालू आर्थिक वर्षात पाणीपुरवठा लाभकर आणि मलप्रवाह सुविधा लाभकर लागू करून नागरिकांवर २० टक्क्यांहून अधिक करवाढ केली आहे. भाजपाने हा अन्यायकारक कर तातडीने रद्द करण्याची मागणी करत आंदोलनाचा इशारा दिला.

वसई विरार पालिकेने अर्थसंकल्पात सुचवलेली करवाढ स्थायी समितीपुढे ही करवाढ मागे घेण्यात आली होती. मात्र चालू वर्षाच्या करात 'पाणीपुरवठा लाभकर आणि मलप्रवाह सुविधा लाभकर' लागू करण्यात आले आहे. शहरातील मलनिःसारण आणि भुयारी गटार योजनेची अवस्था अत्यंत बिकट आहे. सर्वांना पाणीपुरवठा होत नाही. वसईकर आधीच महागाईमुळे त्रस्त आहेत. अशावेळी २० चक्के करवाढ अन्यायकारक आहे, असे भाजपाने म्हटले. प्रशासनाने आधी नागरिकांना दर्जेदार आणि पूर्ण क्षमतेने पाणीपुरवठा व मलनिःसारण सुविधा उपलब्ध करून द्याव्यात आणि त्यानंतरच अशा करांचा विचार करावा असे विरोधी पक्षनेते मनोज पाटील यांनी म्हटले.

गायिका, चित्रपट निर्माती अभिनेत्री काननदेवी यांचा जन्म. २२ एप्रिल १९१६ रोजी झाला.कानन देवी यांचे खरे नाव कानन बाला होते. कानन देवी यांचा जन्म एका बंगाली परिवारात झाला. आपल्या वडिलाच्या निधनामुळे लहानपणीच आईला मदत करू लागल्या होत्या. वयाच्या १० व्या वर्षी त्यांनी 'ज्योति स्टूडियो' निर्मित 'जयदेव' या बंगाली चित्रपटात काम केले. १९३४ साली आलेल्या मा या चित्रपटापासून त्यांचे नाव झाले. नंतर कानन देवी मुंबईला आल्या व न्यू थिएटर मध्ये हिंदी चित्रपटात गाणे व अभिनय असे दोन्ही काम करू लागल्या, त्या साठी उस्ताद अल्ला रखा व भीष्मदेव चटर्जी याच्याकडून संगीताचे धडे घेऊ लागल्या.



# गायिका, चित्रपट निर्माती अभिनेत्री काननदेवी

१९३७ मध्ये आलेल्या 'मुक्ति' या चित्रपटाने कानन देवी यांना न्यू थिएटरच्या पहिल्या कलाकारा मध्ये नेऊन बसवले. १९४१ मध्ये कानन देवी यांनी न्यू थिएटर सोडले व स्वतंत्रपणे काम करू लागल्या. १९४२ साली आलेल्या 'जवाब' हा चित्रपट कानन देवी यांचा सर्वाधिक हिट समजला जातो. यातील दुनिया है तूफान मेल, हे गाणे खूपच गाजले. या नंतर कानन देवी यांचे 'हॉस्पिटल', 'वनफूल' व 'राजलक्ष्मी' असे हिट चित्रपट आहे. १९४८ साली आलेला 'चंद्रशेखर' हा कानन देवी यांचा शेवटचा चित्रपट. ज्यात अशोककुमार हिरो म्हणून होते. १९४९ मध्ये कानन देवी यांनी 'श्रीमती पिक्चर्स' या नावाखाली वामुनेर में, अन्नया, मेजो दीदी, दर्पचूर्ण, नव विद्यान, आशा, आधारे आलो, राजलक्ष्मी ओ श्रीकांता, इंद्रनाथ, श्रीकांता, औ अनदादीदी या चित्रपटांची निर्मीती केली होती. १९७६ साली त्यांना भारत सरकारने दादासाहेब फाळके पुरस्कार देऊन सम्मानित केले होते. कानन देवी या पहिल्या बंगाली अभिनेत्री होत्या ज्यांना हा पुरस्कार मिळाला होता. आपल्या तीस वर्षाच्या कारकिर्दीत त्यांनी साठ चित्रपटात काम केले. त्यांचे उल्लेखनीय चित्रपट 'जयदेव', 'प्रह्लाद', 'विष्णु माया', 'माँ', 'हरि भक्ति', 'कृष्ण सुदामा', 'खूनी कौन', 'विद्यापति', 'साथी', 'स्ट्रीट सिंगर', 'हार-जीत', 'अभिनेत्री', 'परिचय', 'लगन', 'कृष्ण लीला', 'फैसला' और 'आशा'. कानन देवी यांनी अभिनय व पार्श्वगायन या दोन्ही क्षेत्रात नाव कमवले होते. कानन देवी यांचे १७ जुलै १९९२ रोजी निधन झाले. कानन देवी यांना आदरांजली.





# सरकारला शेतकऱ्यांबद्दल आस्था उरली नाही का ? सुळेंचा सवाल

■ पुणे

**राज्यातील** शेतकरी, कायदा-सुव्यवस्था आणि वाढत्या भ्रष्टाचाराच्या मुद्यावरून शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी राज्य सरकारवर जोरदार टीका केली. महाराष्ट्रातील शेतकरी संकटात असताना सरकारकडून केवळ घोषणा होत आहेत, पण प्रत्यक्षात मदत मिळत नाही. सरकारला शेतकऱ्यांबद्दल आस्था उरली नाही का ? तसेच पुण्यातील कायदा आणि सुव्यवस्था पूर्णपणे रामभरोसे असल्याची टीकाही त्यांनी केली. सुप्रिया सुळे म्हणाल्या की, महाराष्ट्रात अवकाळी पावसामुळे शेतकरी मोठ्या अडचणीत सापडले आहेत. सरकारने सरसकट कर्जमाफीचे आश्वासन दिले होते, मात्र अद्याप त्याची अंमलबजावणी झालेली नाही.

# आरोग्य आणि महिला बाल कल्याण समिती बविआकडे

■ विरार

**वसई-विरार** महानगरपालिकेच्या आरोग्य समितीच्या सभापतीपदी निलेश देशमुख आणि महिला व बालकल्याण समितीच्या सभापतीपदी बिना मायकल फुट्यार्डो यांची निवड झाली.

आज पालिकेच्या सभागृहात या दोन्ही समित्यांची निवडणूक पार पाडली. आरोग्य समिती सभापतीपदासाठी बविआचे निलेश देशमुख ९ मते मिळवून विजयी झाले. त्यांनी भाजपाच्या डॉ.योगिता गवळी-करंजकर यांचा पराभव केला. योगिता यांना ६ मते मिळाली. उपसभापतीपदी बविआचे निषाद चोरघे यांनी ९ मते मिळवून भाजपाच्या जितेश हरिश्चंद्र राऊत यांचा पराभव केला. राऊत यांना ६ मते मिळाली.

महिला आणि बालकल्याण समिती सभापती पदासाठी बहुजन विकास आघाडीच्या बिना फुट्यार्डो ९ मते मिळवून विजयी झाल्या.

# देवळात बेकायदेशीर वृक्षतोड ? उपसरपंचाचा आत्मदहनाचा इशारा

■ बीड

**अंबाजोगाई** तालुक्यातील देवळा गावात पोलीस प्रशासनाच्या मदतीने बेकायदेशीर वृक्षतोड केल्याचा आरोप करण्यात आला. गावठाण जमिनीच्या वादातून सत्तेचा गैरवापर झाल्याचा दावा करत उपसरपंच दत्ता साळुंके यांनी प्रशासनाला आव्हान दिले. या प्रकरणात न्याय न मिळाल्यास १५ मे रोजी पाण्याच्या टाकीवर चढून आत्मदहन करण्याचा इशारा त्यांनी दिला.

देवळा येथील गट क्रमांक १३१ आणि १३८ या जमिनींवरून न्यायालयीन वाद सुरू आहे. साळुंके यांच्या म्हणण्यानुसार, न्यायालयाने केवळ सीमांकनाचे आदेश दिले होते. मात्र, पोलीस आणि महसूल प्रशासनाने त्या आदेशाचा विपर्यास करून संबंधित जागेवरील जुनी झाडे तोडण्यास सुरुवात केली. साळुंके यांनी आरोप केला की, पोलीस बंदोबस्तात ही वृक्षतोड करून जमीन एका विशिष्ट व्यक्तीसाठी मोकळी करण्यात आली.

# बिडकीन रुग्णालयात डॉक्टरांना रुग्णाच्या नातेवाईकांकडून हल्ला

■ छत्रपती संभाजीनगर

**छत्रपती** संभाजीनगरच्या बिडकीन येथील ग्रामीण रुग्णालयात अपघातग्रस्त रुग्णाच्या उपचारावरून निर्माण झालेल्या वादातून वैद्यकीय अधिकारी डॉ. सिद्धेश्वर बडे यांना रुग्णाच्या नातेवाईकांकडून मारहाण करण्यात आल्याची धक्कादायक घटना घडली. अपघातात जखमी झालेल्या रुग्णाला उपचारासाठी बिडकीन ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. रुग्णावर वेळेत उपचार होत नसल्याचा आरोप करत नातेवाईकांनी संताप व्यक्त केला.

# मुळशीत दिव्यांग तरुणीवर अत्याचार ! आरोपी अटकेत

**पुणे** - मुळशी तालुक्यातील दुर्गम भागात अत्यंत संतापजनक घटना घडली असून, एका २६ वर्षीय युवकाने दिव्यांग व मतिमंद तरुणीवर अत्याचार केल्याचा प्रकार उघड झाला आहे. या प्रकरणी पौड पोलीस स्टेशन यांनी आरोपीला अटक केली आहे.

ही घटना मुळशी तालुक्यातील मांडवखडक (वेगरे) या डोंगराळ भागात २२ एप्रिल २०२६ रोजी दुपारी घडली. पीडित तरुणी घरी एकटी असताना शेजारी राहणारा आरोपी गजानन भागू पवार घरात घुसून जबरदस्ती अत्याचार करून फरार झाला होता. घटनेनंतर पौड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपी डोंगराळ आणि दुर्गम भागात राहत असल्याने त्याचा शोध घेणे पोलिसांसमोर मोठे आव्हान होते.

# घोडबंदर रोडवरील कामामुळे दोन दिवस वाहतुकीत बदल

■ ठाणे

**ठाणे** शहरातील कायम वाहतूक कोंडीसाठी ओळखल्या जाणाऱ्या घोडबंदर रोडवर आज ८ मेपासून रविवार, १० मेपर्यंत वाहतुकीत मोठे बदल करण्यात आले आहेत. ब्रह्मांड जंक्शन येथे पादचारी पुलाच्या गर्डर उभारणीचे काम हाती घेण्यात आल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे.

मुल्लाबाग बस डेपोजवळ उभारण्यात येणाऱ्या या पुलाचे काम आज रात्री ११.५५ वाजल्यापासून सुरू होऊन १० मे रोजी सकाळी ६ वाजेपर्यंत टप्प्याटप्प्याने सुरू राहणार आहे. या कालावधीत ब्रह्मांड, मानपाडा, कापूरबावडी आणि घोडबंदर रोड परिसरात वाहतुकीचा ताण वाढण्याची शक्यता आहे. विशेषतः ब्रह्मांड सिग्नलकडून कापूरबावडीकडे जाणारा मार्ग पूर्णपणे बंद राहणार असल्याने वाहनचालकांना वळसा घ्यावा लागणार आहे. तसेच मानपाडा उड्डाणपुलाकडे जाणाऱ्या वाहनांनाही प्रवेशबंदी लागू करण्यात आली आहे.

नवाकाळ
Email- contact@navakal.in
24x7 : www.navakal.in

## मौनीच्या कारकिर्दीला नवे वळण



**अभिनेत्री** मौनी रॉय हिच्या कारकिर्दीला आता एक नवे आणि जागतिक वळण मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. मिळालेल्या विशेष माहितीनुसार, मौनी रॉय लवकरच एका आंतरराष्ट्रीय स्तरावरील चित्रपट निर्मितीमध्ये मुख्य भूमिकेत दिसणार आहे. हा प्रकल्प मौनीसाठी आणि या प्रकल्पाशी संबंधित असलेल्या प्रत्येक व्यक्तीसाठी आयुष्य बदलून टाकणारा ठरेल, असा दावा सूत्रांनी केला आहे. या आंतरराष्ट्रीय प्रकल्पाचे स्वरूप आणि विषय सध्या तरी गोपनीय ठेवण्यात आले असले, तरीही त्याची भव्यता मोठी असल्याचे समजते. मौनीने आतापर्यंत बॉलिवूड आणि टेलिव्हिजन क्षेत्रात स्वतः चे वेगळे स्थान निर्माण केले आहे, मात्र या नवीन संधीमुळे तिच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला जाणार आहे. एका मोठ्या जागतिक बॅनरखाली या चित्रपटाची निर्मिती होणार असून, त्यासाठीची तयारी सध्या वेगात सुरू आहे. भारतीय कलाकारांचा जागतिक स्तरावर वाढता प्रभाव पाहता, मौनी रॉयचा हा आगामी प्रवास तिच्या चाहत्यांसाठी आणि चित्रपटसृष्टीसाठी अत्यंत कुतूहलाचा विषय ठरला आहे. लवकरच या प्रकल्पाबाबत अधिकृत घोषणा होण्याची प्रतीक्षा आहे.

## बॉबीच्या 'बंदर'चा टीझर प्रदर्शित

**अभिनेता** बॉबी देओल सध्या त्याच्या कारकिर्दीतील सुवर्णकाळ अनुभवत असून त्याच्या आगामी 'बंदर' या चित्रपटाचा टीझर नुकताच प्रदर्शित झाला आहे. या चित्रपटातील त्याचा अवतार अत्यंत वेगळा आणि अनपेक्षित असल्याने चाहत्यांमध्ये मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे. एका गुंतागुंतीच्या नातेसंबंधावर आधारित असलेल्या या 'रिलेशनशिप ड्रामा'मध्ये बॉबी देओलने अत्यंत रांगडी आणि 'वाईल्ड' भूमिका साकारली आहे.


चित्रपटाच्या टीझरमध्ये बॉबी देओलचा लूक आणि त्याचा वावर पाहून प्रेक्षकांनी त्याला आतापर्यंतची सर्वात आगळीवेगळी भूमिका म्हटले आहे. या टीझरमधील अराजकता आणि पात्रांमधील ताण स्पष्टपणे जाणवतो. यामुळे हा चित्रपट केवळ साधी प्रेमकथा नसून एक तीव्र भावनाप्रधान थरार असेल, असे संकेत मिळत आहेत.



सोशल मीडियावर या टीझरला मोठा प्रतिसाद मिळत असून 'ॲनिमल'नंतर बॉबी देओल पुन्हा एकदा एका दमदार भूमिकेतून प्रेक्षकांसमोर येणार असल्याचे स्पष्ट होत आहे. या आगळ्यावेगळ्या कथानकाची आणि बॉबीच्या अभिनयाची आता सर्वत्र चर्चा सुरू झाली आहे.


## 'धुरंधरः द रिव्हेंज' झळकणार ओटीटीवर

'धुरंधर : द रिव्हेंज' या चित्रपटाने चित्रपटगृहात यशस्वी ५० दिवस पूर्ण केले असून आता हा चित्रपट ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित होण्यासाठी सज्ज झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, येत्या १४ मे रोजी नेटफ्लिक्सवर या चित्रपटाची 'रॉ अँड अनदेखा' आवृत्ती आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रदर्शित केली जाणार आहे. विशेष म्हणजे ही नवीन आवृत्ती चित्रपटगृहात प्रदर्शित झालेल्या आवृत्तीपेक्षा ३ मिनिटांनी मोठी असेल. चित्रपटगृहातील आवृत्तीचा कालावधी ३ तास ४९ मिनिटे आणि ६ सेकंद होता, तर नेटफ्लिक्सवरील या आवृत्तीचा कालावधी ३ तास ५२ मिनिटे इतका असणार आहे. या चित्रपटाचा पहिला भाग ५ डिसेंबर २०२५ रोजी प्रदर्शित झाला होता आणि त्याने बॉक्स ऑफिसवर मोठे यश मिळवले होते. त्यानंतर आलेल्या 'धुरंधर : द रिव्हेंज' या चित्रपटाने यशाचे सर्व विक्रम मोडीत काढले आहेत.



भारतात हा चित्रपट 'जिओहॉटस्टार'वर प्रदर्शित होणार असून तिथेही ही वाढीव आवृत्ती पाहायला मिळणार का, याकडे चाहत्यांचे लक्ष लागले आहे.

## उत्सुकता वाढवणारा ट्रेलर



**अभिनेता** सैफ अली खान पुन्हा एकदा एका दमदार भूमिकेत प्रेक्षकांसमोर येण्यासाठी सज्ज झाला असून, त्याच्या आगामी 'कर्तव्य' या चित्रपटाचा ट्रेलर नुकताच प्रदर्शित झाला आहे. नेटफ्लिक्सवर प्रदर्शित होणाऱ्या या क्राईम ड्रामामध्ये सैफ अली खान एका पोलीस अधिकाऱ्याच्या भूमिकेत असून, कर्तव्य, भ्रष्टाचार आणि कौटुंबिक संकट यांच्यातील संघर्षाचा प्रवास यात मांडण्यात आला आहे.

ट्रेलरमध्ये सैफ अली खानचे पात्र एका अत्यंत कठीण परिस्थितीत अडकलेले दिसते, जिथे त्याला एका बाजूला आपल्या खात्यातील भ्रष्टाचार आणि गुन्हेगारी व्यवस्थेशी लढा द्यायचा आहे, तर दुसरीकडे आपल्या कुटुंबावर ओढवलेल्या संकटातून मार्ग काढायचा आहे. या चित्रपटामध्ये कर्तव्यनिष्ठेची नेमकी व्याख्या काय असू शकते, याचे चित्रण अत्यंत प्रभावीपणे करण्यात आले आहे.

सैफ अली खानच्या अभिनयाची छाप ट्रेलरमध्ये स्पष्टपणे जाणवते, विशेषतः त्याचे गंभीर संवाद आणि तणावपूर्ण प्रसंग प्रेक्षकांना खिळवून ठेवणारे आहेत. गुन्हेगारी विश्वाचे आणि पोलिस दलातील अंतर्गत राजकारणाचे वास्तववादी दर्शन घडवणारा हा चित्रपट ओटीटी प्लॅटफॉर्मवर चर्चेचा विषय ठरण्याची शक्यता आहे. 'कर्तव्य'मधील या आव्हानात्मक भूमिकेमुळे सैफच्या कारकिर्दीत आणखी एका महत्त्वाच्या प्रोजेक्टची भर पडली असून, चाहते आता या चित्रपटाच्या प्रदर्शनाची प्रतीक्षा करत आहेत.

## निधनाच्या अफवांविरोधात शक्तींचा संताप



**ज्येष्ठ अभिनेते** शक्ती कपूर यांनी त्यांच्या निधनाबाबत समाजमाध्यमांवर पसरणाऱ्या अफवांचे खंडण केले असून अशा अफवा पसरवणाऱ्यांविरोधात सायबर पोलिसांकडे तक्रार करण्याचा निर्णय घेतला आहे. गेल्या काही दिवसांपासून शक्ती कपूर यांचे निधन झाल्याच्या खोट्या बातम्या इंटरनेटवर फिरत होत्या, ज्यामुळे त्यांच्या चाहत्यांमध्ये आणि चित्रपटसृष्टीत चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते. यावर स्पष्टीकरण देताना त्यांनी स्वतः आपण सुखरूप असल्याचे सांगितले आणि या अफवांना 'फेक' असल्याचे स्पष्ट केले.

अशा प्रकारच्या चुकीच्या माहितीमुळे कुटुंबाला आणि मित्रपरिवाराला नाहक मनस्ताप सहन करावा लागतो, अशी भावना त्यांनी व्यक्त केली आहे. केवळ खळबळ उडवून देण्यासाठी कोणाच्याही आरोग्याबाबत किंवा आयुष्याबाबत अशा अफवा पसरवणे हे अत्यंत चुकीचे असून, या प्रकरणाचा मुळापासून छडा लावण्यासाठी ते आता कायदेशीर पावले उचलत आहेत. सायबर विभागामार्फत या प्रकरणाची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी ते करणार आहेत. यापूर्वीही अनेक दिग्गज कलाकारांच्या बाबतीत अशा प्रकारचे गैरप्रकार घडले असून शक्ती कपूर यांनी आता याविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे.

## 'आखिरी सवाल'ला हिरवा कंदिल

**संजय** दत्त यांची मुख्य भूमिका असलेल्या 'आखिरी सवाल' या आगामी चित्रपटाला केंद्रीय चित्रपट प्रमाणन मंडळाने हिरवा कंदील दाखवला असून, निर्मात्यांनी आता या चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख निश्चित केली आहे. हा चित्रपट येत्या १५ मे रोजी चित्रपटगृहात प्रदर्शित होणार असल्याचे जाहीर करण्यात आले आहे. सेन्सॉर बोर्डाकडून आवश्यक ते क्लिअरन्स मिळाल्यानंतर आता या चित्रपटाच्या प्रदर्शनाचा मार्ग पूर्णपणे मोकळा झाला आहे.

संजय दत्त या चित्रपटात एका दमदार आणि गंभीर भूमिकेत दिसणार असून, कथेची गुंफण एका रहस्याभोवती करण्यात आल्याचे समजते. मे महिन्याच्या मध्यावर चित्रपट प्रदर्शित होणार असल्याने उन्हाळी सुट्ट्यांचा फायदा या चित्रपटाला मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. बऱ्याच काळानंतर एका वेगळ्या धाटणीच्या चित्रपटातून प्रेक्षकांसमोर येत असल्याने संजय दत्तच्या चाहत्यांमध्ये मोठी उत्सुकता आहे.




## नसरापूर प्रकरणी अंबरनाथ बदलापूर व पाचोऱ्यात आंदोलन

■ बदलापूर

**नसरापूर** येथे चार वर्षीय चिमुकलीवर अत्याचार करून हत्या करण्यात आल्याच्या घटनेचा निषेध म्हणून अंबरनाथ आणि बदलापुरात आंदोलन करण्यात आले. यावेळी चिमुकलीला न्याय मिळालाच पाहिजे आणि गप्प बसणे नाही, आता आवाज उठवणे गरजेचे अशा घोषणांमधून नागरिकांनी तीव्र भावना व्यक्त केल्या. आंदोलकांनी आरोपीला तत्काळ अटक करून फाशीची शिक्षा देण्याची मागणी करत निषेध व्यक्त केला. या आंदोलनात भाजपा महिला मोर्चा, ब्राह्मण संघ, हेरंब सेवा समिती यांसह अनेक सामाजिक संघटना सहभागी झाल्या. पाचोरा येथेही शिंदे गटाच्या महिला आघाडीच्या वतीने या घटनेचा निषेध करण्यात आला. यावेळी महिला पदाधिकाऱ्यांनी मागणी केली की, अशा गंभीर गुन्ह्यांवर त्वरित कारवाई करून 'फास्ट ट्रॅक' न्यायालयातून निकाल देणे अत्यावश्यक आहे.

## पुण्यातील संभाजी महाराजांच्या स्मारकाचे सुशोभिकरण करणार

**सव्वा तीन कोटी खर्च**

■ पुणे

**शहरातील** डेक्कन परिसरातील धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज स्मारकाच्या ठिकाणी दगडी मेघडंबरी उभारणे, तसेच भुयारी मार्गासह परिसराचे सुशोभिकरण करण्यात येणार आहे. या कामासाठी सव्वातीन कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत. त्या प्रस्तावास स्थायी समितीने काल मान्यता दिली.

धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज स्मारकाच्या ठिकाणी दगडी मेघडंबरीदेखील बसविली



जाणार आहे. स्मारकाचे ऐतिहासिक, सांस्कृतिक महत्त्व लक्षात घेऊन स्मारकाचे काम आकर्षक स्वरूपात करण्याचे महापालिकेने निश्चित केले आहे. त्यानुसार, संबंधित कामास सुरुवात केली. संबंधित कामासाठी तीन कोटी १२ लाख रुपयांचे पूर्वगणनपत्रक तयार केले होते. निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर मे. महिना कन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीची निविदा मान्य केली. सर्व खर्च गृहीत धरून तीन कोटी २४ लाख रुपये खर्च या कामासाठी येणार आहे. त्यानुसार, संबंधित कंपनीस काम देण्यात आले, अशी माहिती स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी दिली

## नेरळ-शिरूर चौपदरी १३४ किमी महामार्ग प्रकल्पाला हिरवा कंदील

■ मुंबई

**मुंबई,** पुणे, मराठवाडा आणि अहिल्यानगरला अधिक वेगवान, सक्षम आणि आधुनिक जोडणी देणाऱ्या महत्त्वाकांक्षी नेरळ-वांद्रे-पाईट-शिरोली-पाबळ-मळठण-शिरूर या १३४ किमी. लांबीच्या चौपदरी महामार्ग प्रकल्पाला राज्य शासनाची मान्यता मिळाली. या प्रकल्पासाठी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सातत्यपूर्ण प्रयत्न केले होते. राज्याच्या सर्वांगीण विकासाचे त्यांनी पाहिलेले स्वप्न पुढे नेत हा प्रकल्प प्रत्यक्षात साकार करणे, हीच त्यांना खरी आदरांजली असल्याचे उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी एक्स पोस्ट करत म्हटले.

सुनेत्रा पवार यांनी एक्सवर लिहिले की, मुंबई, पुणे, मराठवाडा आणि अहिल्यानगरला अधिक वेगवान, सक्षम आणि आधुनिक जोडणी देणाऱ्या नेरळ-वांद्रे-पाईट-शिरोली-पाबळ-मळठण-शिरूर या १३४ कि.मी. लांबीच्या चौपदरी महामार्ग प्रकल्पाला राज्य शासनाची मान्यता मिळाली आहे. पुणे-शिरूर मार्गावरील वाढती वाहतूक कोंडी कमी करून मुंबई व जेएनपीटीशी थेट संपर्क निर्माण करणारा हा मार्ग राज्याच्या विकासासाठी गेमचेंजर ठरणार आहे. रायगड, पुणे, मराठवाडा आणि अहिल्यानगर परिसराच्या आर्थिक, औद्योगिक आणि दळणवळण विकासाला या प्रकल्पामुळे मोठी चालना मिळणार आहे.

## कल्याणला धुळीच्या वादळाचा मोठा तडाखा! घरांचे पत्रे उडाले

■ कल्याण

**तापमानाचा** पारा वाढल्याने अंगाची लाहीलाही होत असतानाच काल दुपारी अचानक हवामानामध्ये बदल झाला आणि कल्याण शहर व परिसरात धुळीचे वावटळ उठले. घोंघावणारा आवाज आणि हवेत पसरलेले धुळीकण यामुळे क्षणात समोरचे दिसेनासे झाले. धुळीच्या वादळाचा सुमारे पंधरा ते वीस मिनिटे तडाखा बसला. यावेळी अनेक भागांतील घरांचे पत्रे उडाले, झाडे कोसळली आणि वीजही गायब झाली.

या वादळात रस्त्यांवरील वाहनेही अचानक जागीच थांबली. धुळीचे लोटच्या लोट उसळल्याने काही काळ भीतीचे वातावरण पसरले. प्रचंड मोठा आवाज तसेच अचानक आलेल्या वादळामुळे क्षणभर काय झाले हे कुणालाच कळले नाही. झोपडपट्टी तसेच चाळींच्या भागात तर धुळीच्या वावटळीने चांगलाच दणका दिला. वाळत घातलेले कपडे, अनेक वस्तूही हवेत उडाल्या. रहिवाशांची पळापळ झाली. या वादळाचा वेग एवढा मोठा होता की, कल्याणच्या बिर्ला कॉलेजजवळ दोन झाडे घरांवर कोसळली. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही; पण घरांतील साहित्याचे नुकसान झाले. बाजारपेठ पोलीस ठाण्याच्या इमारतीवरील शेडच्या पत्र्यांचे अतोनात नुकसान झाले.

## केपीआयटीचे अध्यक्ष डॉ. रवी पंडित यांचे निधन



■ पुणे

**माहिती** तंत्रज्ञान क्षेत्रातील आघाडीची कंपनी केपीआयटी टेक्नॉलॉजीचे अध्यक्ष तथा सहसंस्थापक डॉ. एस. बी. (रवी) पंडित (७५) यांचे आज पहाटे पुण्यात निधन झाले. त्यांच्या निधनामुळे उद्योग क्षेत्रात शोककळा पसरली.

केपीआयटी ही माहिती तंत्रज्ञान व शाश्वत प्रगतीला चालना देणारी एक आघाडीची भारतीय कंपनी समजली जाते. रवी पंडित यांनी ३ दशकांत जागतिक दर्जाचे नावीन्य व सखोल सामाजिक उद्देश यांचा संगम साधणाऱ्या संस्थांची उभारणी करून त्यांचे नेतृत्व केले. रवी पंडित केपीआयटीचे सहसंस्थापक व अध्यक्ष होते. ही कंपनी जागतिक सॉफ्टवेअर-डिफाइन्ड मोबिलिटीमधील एक आघाडीची कंपनी आहे. ही कंपनी ऑटोमोटिव्ह इंजिनिअरिंग सोल्यूशन्सवर लक्ष केंद्रित करत जगभरातील १५ देशांत कार्यरत आहे.

## 'त्या' म्हाताऱ्याचा बंदोबस्त करा आमदार निलेश राणेंचे वक्तव्य

**वैभव नाईकांकडून व्हिडिओ पोस्ट**

■ सिंधुदुर्ग

**तळकोकणात** विकासकामांच्या श्रेयवादावरून महायुतीत नवा राजकीय वाद पेटला. घोटगे येथे जिल्हा परिषदेचे ४ वेळा सदस्य राहिलेले लॉरेन्स उर्फ म्हातु मान्येकर यांनी लावलेल्या एका बॅनरमुळे आमदार निलेश राणे आक्रमक झाले. त्या म्हाताऱ्याचा बंदोबस्त करा, असे वक्तव्य राणे यांनी केले असून त्याचा व्हिडिओ उबाठा आमदार वैभव नाईक यांनी पोस्ट केला.

भाजपाचे माजी जिल्हा परिषद सदस्य लॉरेन्स उर्फ म्हातु मान्येकर यांनी घोटगे येथे माजी मंत्री रवींद्र चव्हाण यांच्या माध्यमातून विकासकामांना मंजुरी मिळाल्याचा दावा करणारा बॅनर लावला होता. यावरून संताप व्यक्त करत निलेश राणे यांनी कार्यकर्त्यांसमोर मान्येकरांविषयी अपशब्द वापरल्याचा व्हिडिओ व्हायरल झाला. माजी आमदार वैभव नाईक यांनी संबंधित व्हिडिओ पोस्ट करत राणे यांच्यावर टीका केली. वैभव नाईक म्हणाले की, जिल्हा परिषद सदस्यपदी निवडून आलेले लॉरेन्स उर्फ म्हातु मान्येकर यांनी माजी मंत्री रवींद्र चव्हाण यांच्या माध्यमातून घोटगे येथे विकासकाम मंजूर केल्याचा बॅनर लावून श्रेय घेण्याचा प्रयत्न केला.

त्यावरून आमदार निलेश राणेंनी म्हातु मान्येकर यांच्या वयाचेही भान न ठेवता मुख्यमंत्री असलेल्या भाजपा पक्षाचा कोणताच मंत्री माझ्या शिफारशीशिवाय माझ्या मतदारसंघात विकास काम मंजूर करू शकत नाही असे सांगत म्हाताऱ्याचा (म्हातु मान्येकर) आताच बंदोबस्त करा असे कार्यकर्त्यांना ठणकावून सांगितले.

## पाटण्यात बीपीएससी परीक्षार्थींच्या आंदोलनात पोलिसांकडून लाठीमार

■ पाटणा

**पाटणा** येथे बीपीएससी टीआरई-४ भरती प्रक्रियेच्या अधिसूचनेसाठी विद्यार्थ्यांनी आंदोलन छेडले. या आंदोलनात पोलीस आणि आंदोलकांमध्ये संघर्ष झाला. शांततापूर्ण आंदोलन करत असलेल्या उमेदवारांवर पोलिसांनी लाठीमार केल्याचा आरोप आहे. या कारवाईत अनेक परीक्षार्थी जखमी झाले. या घटनेमुळे बिहारमधील शिक्षक भरती प्रक्रियेवरून वातावरण तापले आहे.

बीपीएससी टीआरई-४ भरतीची अधिसूचना गेल्या दोन वर्षांपासून प्रलंबित आहे. उमेदवार सातत्याने सरकारकडे भरती प्रक्रिया सुरू करण्याची मागणी करत आहेत. मात्र, वारंवार आश्वासने मिळूनही अधिसूचना जाहीर न झाल्याने अखेर विद्यार्थ्यांनी रस्त्यावर उतरून आंदोलन सुरू केले. आंदोलकांचे म्हणणे आहे की, भरती प्रक्रियेत झालेल्या विलंबामुळे अनेक उमेदवार वयोमर्यादा ओलांडण्याच्या स्थितीत आहेत.

## झाडावर वीज कोसळली! तरुणाचा जागीच मृत्यू

■ यवतमाळ

**दुपारी** अचानक वातावरण बदलून सुरू झालेल्या मुसळधार पावसात शेतातील एका झाडावर वीज कोसळून झाडाखाली उभ्या एका ३२ वर्षीय तरुणाचा जागीच मृत्यू झाला. तर एक महिला आणि तिचा मुलगा गंभीर जखमी झाले. ही घटना उमरखेड तालुक्यातील शिवाजीनगर शिवारात काल दुपारी घडली.

उमरखेड तालुक्यातील दराटी-कोर्टा मार्गावरील शिवाजीनगर शिवारात नंदा जीवन आडे यांचे शेत आहे. काल दुपारी या शेतात ज्वारी काढणीचे काम सुरू होते. शिवाजीनगर येथील रहिवासी श्रीनिवास देविदास राठोड (३२) हा तरुण यंत्र घेऊन ज्वारी काढण्यासाठी गेला होता. दुपारी अडीचच्या सुमारास अचानक हवामान बदलले आणि विजांच्या कडकडाटासह पावसाला सुरुवात झाली. पावसापासून बचाव करण्यासाठी श्रीनिवास हा जवळच असलेल्या आंब्याच्या झाडाखाली आश्रयाला गेला. त्याच्या पाठोपाठ शेतमालक नंदा आडे आणि त्यांचा मुलगा यश हेदेखील झाडाखाली जात होते. त्याच वेळी त्या झाडावर वीज कोसळली. विजेचा झटका इतका तीव्र होता की, श्रीनिवास राठोड याचा जागीच मृत्यू झाला. तर नंदा जीवन आडे (३८) आणि यश जीवन आडे (१७) हे दोघेही विजेच्या धक्क्याने गंभीररित्या भाजले गेले. त्यांना तातडीने किनवट येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांची प्रकृती चिंताजनक आहे.

## आर्लेकरांना लोकशाहीचे धडे द्या खा. संजय राऊत यांची प्रतिक्रिया



■ मुंबई

**तामिळनाडूत** विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर नवे सरकार स्थापन करण्याबाबत राज्यपाल राजेंद्र आर्लेकर यांनी घेतलेल्या भूमिकेवर उबाठाचे प्रवक्ते संजय राऊत यांनी हल्ला चढवला. निकालानंतर सर्वात मोठ्याला सरकार स्थापन करण्यासाठी आमंत्रित करण्याची प्रथा धुडकारणाऱ्या आर्लेकर यांना लोकशाहीचे धडे देण्याची गरज आहे, असे राऊत म्हणाले. सरकारचे बहुमत हे राज्यपालांच्या निवासस्थानी ठरवायचे नसते. ते विधानसभेत सिद्ध करून दाखवायचे असते, हे सर्वोच्च न्यायालयाने याआधी स्पष्ट केले. त्यामुळे सर्वाधिक १०८ जागा मिळवणाऱ्या टीव्हीके पक्षाला सरकार बनवण्यासाठी आमंत्रित करायला ते नकार देत आहेत. ही लोकशाहीची थट्टा आहे,असे राऊत म्हणाले.

अभिनेता विजय थलापती यांना काही राजकीय पार्श्वभूमी नसताना पहिल्याच निवडणुकीत त्यांच्या पक्षाने शतक झळकावले. मात्र महाराष्ट्रात शिवसेनेला अद्याप एक हाती सत्ता मिळवता आलेली नाही असे का, असा प्रश्न विचारला असता राऊत यांनी दिवंगत शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे एक वाक्य बोलून दाखवले. दाक्षिणात्यांची जात्यांधता आणि मुसलमानांची धर्मांधता जोपर्यंत मराठी माणसाच्या रक्तात भिनत नाही तोपर्यंत महाराष्ट्रात असे होणे शक्य नाही,असे बाळासाहेब नेहमी म्हणायचे,असे म्हणत राऊत यांनी प्रश्नाचे अप्रत्यक्षपणे उत्तर दिले.

